उपसंहार

# उपसंहार

मराठी साहित्याच्या प्रांगणात अनेक वाङ्मय प्रकार दृष्टीपथात येतात. आत्मचरित्र अलिकडे ललित वाङ्मयाकडे झुकणारा असा एक आकृतिबंध. किंबहुना ललित वाङ्मयाचाच तो एक प्रकार आपण मानू लागलो आहोत. या आकृतिबंधाला समग्रतेचे एक परिमाण असते. ते केवळ कल्पकतेच्या पातळीवरचे नसते. तर आत्मचरित्रकाराच्या प्रामाणिकपणाचे त्यातून दर्शन घडते. आत्मचरित्र म्हणजे मूल्यगर्भ दृष्टीने घेतलेल्या स्वतःच्या जीवनाचा तो एक आत्मशोध असतो. विशेषत: म्हणजे एक संवेदनाशील व्यक्तिमनाचा तो जीवन शोध आहे. मात्र त्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टीबाबत डॉ.अंजली सोमण म्हणतात " सत्य कथनाशी बांधीलकी राखणे, वर्तमानकाळाच्या परिस्थितीतून ( Paratanter ) भूतकालाची मांडणी करणे, तपशीलाबाबत निवडीचे तत्व स्वीकारणे, हे आत्मचरित्रकारांच्या व्यक्तातील महत्वाचे घटक आहेत.[1] आत्मचरित्रामुळे केवळ व्यक्तिच्या मनाचे प्रतिबिंब उमटले असे नाही तर तो ज्या समाजात राहतो त्या समाजाचे प्रतिबिंबही त्यात उमटलेले असते. त्या संदर्भात म्हणतो " An Autobiography is not only a reflection of an individual mind but also a reflection of the State of Social Conciousness[2] "आत्मचरित्रकार आपल्या आत्मचरित्राद्वारे आपली कहाणी सांगता सांगता आपल्या मन:प्रवृत्तीचे दर्शन ही न कळत घडवून देतो. त्याचे ते तटस्थवृत्तीने स्वतःच्या जीवनाचे सिंहावलोकन असते. त्याची प्रांजळता आणि प्रामाणिकता त्यातून व्यक्त होते. त्याच बरोबर तत्कालीन समाज परिस्थितीचे व समाज मनाचे ही प्रतिबिंब उमटते. त्यामुळे त्याला एक कलात्मकता प्राप्त होते. पुरुषांच्या आत्मचरित्राप्रमाणेच स्त्रियांची

आत्मचरित्रे लिहिलेली आढळतात. स्त्रियांच्या आत्मचरित्रांतील आनंदीबाई शिर्के यांच्या ' सांजवात ' यात आत्मचरित्राचा सामाजिक, आणि वाङ्मयीन मूल्यमापनाच्यादृष्टीने या प्रबंधिकेतून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रामुख्याने पहिल्या प्रकरणातून आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप आणि त्याचे कलात्मक मूल्यमापन,करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी आत्मचरित्रा बाबत अनेकांनी केलेल्या व्याख्यांचा संदर्भ विचारात घेऊन त्यांचे वाङ्मयीन महत्व उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये स्त्रियांची आत्मचरित्रे स्वरूप आणि विकास यांचा नीटसपणे व नेमकेपणाने विचार मांडून स्त्रियांच्या आत्मचरित्रांचे वाङ्मयीन स्वरूप थोडक्यात जाणवून देण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: १९६० नंतर आत्मचरित्रातल्या दिसणाऱ्या काही प्रकृती लक्षात घेता स्त्रियांची आत्मचरित्रे म्हणजे त्यांच्या पतीची चरित्रे ही प्रचलित समजून या कालखंडातील गृहिणीच्या आत्मचरित्रांनी बदलली परंपरेनी घालून दिलेली गृहिणी धर्माची चौकट ओलांडून काही स्त्रियांना जगावे लागले. त्याची आत्मचरित्रे गृहिणी पदाच्या मर्यादित वर्तुळातून बाहेर पडली आहेत.[3] म्हणजे प्रारंभीची स्त्रियांची आत्मचरित्रे पती स्तोत्रे गाणारीच होती हे लक्षात येते पण नंतर विशेषत: लक्ष्मीबाई टिळक ( स्मृतिचित्रे ) ,शिलवतीबाई केतकर ( मीच हे सांगीतले पाहिजे ) ही पती स्तोत्रे गाणारी आत्मचरित्रे असली तरी त्यातून त्याचे दोषही दाखवून दिले आहेत. तर ' माझी कहाणी ', द्रौपदीची थाळी ', ' स्वर वंदनो, ' पण एकत कोण ' , ' अश्वथांची फुले ', ' रंगले मी झुंजले मी ' ही काही विशीष्ट हेतूनी लिहिलेली आत्मचरित्रे,त्यात काही समस्यांचाही विचार झालेला आहे. उदाहरणार्थ विधवांचे उन्मत्त मन ' ( माझी कहाणी ), विधवा परित्यक्ता ,स्त्रियांचा विचार ( हे गीत जीवनाचे ), अनाथ अपंगाना मदत विसकटलेल्या जीवनांचे चित्रण ( स्नेहांकिता ) समाज मनाचे चित्रण

( अजूनही चालतेची वाट ) तर जीवनातील चढ उतार ( जाऊमी सिनेमात ) ( सांगत्ये ऐका ) स्वरवंदना ) शालेय जगताचे चित्रण ( स्मरण साखळी ), ( चाकोरीबाहेर ), ( गोदावरंग ), वारली आदिवासी समाजाचे चित्रण ( जेव्हा माणूस जागा होतो ) तर मृणालीनीबाई, उषाताई डांगे यांच्या आत्मचरित्रातून कामगारांच्या चळवळीचे दर्शन अशा काही सामाजिक विचार्यांना ` स्व ` जीवनाच्या अनुषंगानेच स्पर्श झालेला आहे.

या स्त्रियांच्या आत्मचरित्रांतून ठळकपणे उठून दिसणारे, आनंदीबाई शिर्के यांचे ` सांजवात ` हे आत्मचरित्र. तिसऱ्या प्रकरणात स्त्रियांच्या आत्मचरित्रांत कलात्मक पातळीवर उठून दिसणाऱ्या ` सांजवात ` या आत्म - चरित्रांतील आनंदीबाई शिर्के यांच्या जीवन गाथेचा आलेख त्यांच्या स्वानुभवांच्या उदाहरणाद्वारे विचारांत घेतला आहे. त्यांचा जीवनपट रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

चौथ्या प्रकरणाते सांजवात ` मधील सामाजिक जीवनाचा पट आनंदी - बाईंनी जीवनानुभूतीच्या अनुषंगानी सविस्तरपणे उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या जीवन गाथेबरोबरच, म्हणजे त्यांच्या स्वजीवनाबरोबरच तत्कालीन ,सामाजिक,जीवनांतील विवाह पध्दत, हुंडा पध्दत, शैक्षणिक दृष्टी, विधवा समस्या ,समाजातील दारिद्र्य, स्त्रियांचा उद्योग त्याकाळातील प्रवास, आचार्यांचे स्वरुप,धार्मिक जीवन, रीतीरिवाज,लहान मुलांच्यावरील संस्कार, प्रथा यांचा विचार केलेला आहे.

पांचव्या प्रकरणात ` सांजवात ` या आत्मचरित्राची वाङ्.मयीन गुणवत्ता ,त्याचे कलात्मक मूल्य इतर विचारवंताच्या आधारानी व आनंदीबाई शिर्के यांच्या ` सांजवात ` मधील संदर्भांनी जाणवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

असा या प्रबंधिकेचा उपसंहार असून मराठी स्त्रियांच्या आत्मचरित्रातील परंपरेला तिच्या मर्यादासह जागवणारे असे हे आत्मचरित्र आहे असे म्हणावयास हरकत नाही.

# संदर्भ


१ डॉ.अंजली सोमण पृ.क्र.१२१

` साहित्य आणि सामाजिक संदर्भ`

प्रतिमा प्रकाशन ( ८५१ )

१३५९ सदाशिव पेठ, पुणे

४११ ०३० , प्र.आ.१९८९.

२ सेमेन्सी पृ.क्र. २३०

Biography and society
Edit. Daniel Bertaux
Sponsored by the
International
Sociological Association
ISA - 1981.

३ गो.म.कुलकर्णी ` वाटा आणि वळणे ` पृ.१४

नव साहित्य प्रकाशन

बेळगांव

प्र.आ. २६ जानेवारी, १९७५